# शिवाजी विद्यापीठात आज चंद्रनिरीक्षण

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज, गुरुवारी चंद्रनिरीक्षण आयोजित केले आहे. यावर्षी आंतरराष्ट्रीय चंद्रमहोत्सव दि. ४ ते १० ऑक्टोबर या जागतिक अंतराळ आठवड्यामध्ये साजरा करण्याचे आवाहन नासा प्लॅनेटरी सोसायटी व लुनार अँड प्लॅनेटरी इन्स्टिट्यूटतर्फे करण्यात आले आहे. या अनुषंगाने विद्यापीठाच्या अवकाश केंद्राच्या वतीने आज, गुरुवारी चंद्राचे निरीक्षण करण्यासाठी विशेष कार्यक्रम पदार्थविज्ञान अधिविभागामध्ये आयोजित केला आहे. यावेळी चंद्राच्या पृष्ठभागांचे निरीक्षण बारा इंच दुर्बिणीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. रात्री साडेसात ते साडेदहा या वेळेत हा कार्यक्रम होणार आहे. खगोलप्रेमींनी चंद्रनिरीक्षण व त्याविषयीच्या वैज्ञानिक माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी सहभाग घ्यावा, असे आवाहन अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यापीठात प्लास्टिकच्या पुनर्वापरावर चर्चा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभाग आणि किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यांच्यातर्फे विद्यापीठात बुधवारी 'प्लास्टिक वापर, बंदी आणि पर्याय' यावर चर्चासत्र झाले. त्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी प्रशांत गायकवाड प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत होते. या चर्चासत्रामध्ये पर्यावरणशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या चर्चासत्रास अनिल चौगुले, चिदंबर शिंदे, राहुल पवार, विद्यार्थी उपस्थित होते. पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. किर्लोस्कर उद्योग समूहाचे प्रतिनिधी व्ही. एम. देशपांडे यांनी 'किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवा'ची माहिती दिली. डॉ.

लोकमत

## जनार्दन वाघमारे : ताराराणी विद्यापीठाचा अमृतमहोत्सव सोहळा प्रारंभ

# जगाला 'विद्यापीठा'ची भेट भारतभूमीतून

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इसवी सनापूर्वी जगात विद्यापीठे नव्हती, त्या काळात फक्त भारतभूमीत तक्षशीला, नालंदा ही दोन महान विद्यापीठे होती. त्यामुळे भारतभूमीमुळे जगाला विद्यापीठांची भेट मिळाली, असे म्हणता येईल, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे माजी कुलगुरु व माजी राज्यसभा सदस्य डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले.

ताराराणी विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी सोहळा प्रारंभानिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी ते 'उच्च शिक्षणासमोरील आव्हाने' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतिकुमार पाटील होते.

वाघमारे म्हणाले, देशात सध्या कालबाह्य शिक्षण सुरु आहे. ते




कोल्हापुरात ताराराणी विद्यापीठाच्या अमृतमहोत्सवी सोहळा प्रारंभानिमित्त व्याख्यानात जनार्दन वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डावीकडून अशोकराव पर्वते, डॉ. एस. एन. पवार, डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राजक्त पाटील उपस्थित होते.

शिक्षणपद्धतीत चार सूत्रे आणली. काय होण्यासाठी शिकावे, काहीतरी करण्यासाठी शिकावे, शिकण्यासाठी कसे शिकावे, एकत्रित जगण्यासाठी कसे शिकावे यांवर कटाक्षाने भर

ते म्हणाले, पाश्चिमात्य शिक्षण पद्धतीत निकालानंतर एकत्र येऊन विश्लेषण करतात. नियोजनावर भर देतात, जादा तास, १५ दिवसांत चाचणी परीक्षा घेतली जाते.

विद्यार्थी आणि नावीन्याचा शोध घेणाऱ्या संस्था या गोष्टी शिक्षणाच्या सूत्रामध्ये असणे गरजेचे आहे.

उषाराजे हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी गौरवगीत गायले. एस.

### शिक्षणाचा व्यापाराशी संबंध

वाघमारे म्हणाले, एकेकाळी शिक्षण हे सेवेचे साधन मानले जात होते. आज जागतिकीकरणामध्ये शिक्षणाचा व्यापाराशी संबंध आला आहे. शिक्षणाबरोबर ज्ञान, मूल्य आणि कौशल्य यांची गरज आहे.

प्रा. डॉ. सुजय पाटील यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. जयसिंगराव सावंत यांनी आभार मानले.

यावेळी संस्थेचे सचिव प्राजक्त पाटील, उपाध्यक्ष डॉ. एस. एन. पोवार, विश्वस्त अशोक पर्वते, कांचन पाटील, जयश्री पाटील, प्रा. डॉ. भारती शेळके, डॉ. पी. एस. पाटील, प्रा. ए. एम. साळोखे यांच्यासह विद्यार्थिनी

# शिवाजी विद्यापीठात आज चंद्र महोत्सव

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्रातर्फे पदार्थ विज्ञान अधिविभाग येथे आज, गुरूवारी आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्ताने चंद्राच्या पृष्ठभागांचे निरीक्षण १२ इंच दुर्बिणीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. सायंकाळी साडेसात ते रात्री साडेदहा या वेळेत चंद्र निरीक्षण करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सव हा चंद्र विज्ञान आणि त्या संबंधीचे शोध याच्या स्मरणार्थ २०१० सालापासून दरवर्षी साजरा करण्यात येतो. यावेळी चांद्रयान २ मोहिमेचा माहितीपट पदार्थविज्ञान विभागामध्ये दाखवण्यात येणार आहे. खगोलप्रेमींनी यामध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

# 'किर्लोस्कर वसुंधरा'चा पडदा खुला

अमित गद्रे



प्लास्टिकमुक्त पृथ्वी करून किर्लोस्कर वसुंधरा चित्रपट महोत्सवाच्या अनोख्या उदघाटनप्रसंगी शालेय विद्यार्थी. सोबत विजय टिपुगडे, राहुल पवार, अजेय दळवी, धीरज जाधव, वीरेंद्र चित्राव, चंद्रहास रानडे.

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

कागदी पिशव्यांचे झुंबर, पत्रावळी व बांबूच्या तट्ट्यांच्या कमानी, झाडू, सूप व दुरडीच्या मनुष्याकृती, पत्रावळ्यांची तोरणं आणि कागदी शंकूचे पताके अशी प्रवेशद्वारापासून सभागृहापर्यंत करण्यात आलेली पर्यावरणपूरक सजावट. व्यासपीठावर बांबूपासून बनवलेल्या तट्ट्याचा फलक, मातीपासून बनवलेला पाण्याचा तांब्यापेला, दुरडीतून पाहुण्यांना दिलेली टेराकोटाची समई अशा इत्यंभूत पर्यावरणात्मक गोष्टी.अशा हिरवाई जपणाऱ्या वातावरणात बुधवारी दहाव्या किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उदघाटन झाले. प्लास्टिक पिशवीत अडकलेला पृथ्वीगोल शालेय मुलांच्या हस्ते मुक्त करून पुढच्या पिढीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या ओजस, आयुषी, इरा, सिरी, तनिष्का या मुलांकडे देऊन एका अनोख्या पद्धतीने या महोत्सवाचे उदघाटन करण्यात आले.

१२ ऑक्टोबरपर्यंत हा महोत्सव सुरू राहणार आहे. मछली वाघिणीवर आधारित 'एस नल्लामुथू' या लघुपटाने महोत्सवाचा पडदा उगडला. त्यानंतर 'क्रीस जॉर्डन', 'गॅमो द क्वीन ऑफ माउंटन्स' हे लघुपट दाखविले. तरंगते राष्ट्रीय उद्यान अशी ओळख असलेल्या केइबुल लामजो नॅशनल पार्क येथील नामशेष होत असलेल्या हरणाच्या जातीला कसे वाचवता येईल यावर बेतलेल्या 'द रिटर्न ऑफ सांगाई' या लघुपटाने पहिल्या दिवसाची सांगता झाली.

## 'प्लास्टिकमुक्त पृथ्वी'तून बालचित्रपट महोत्सवाचे उद्घाटन

महोत्सवाअंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या कागदी, कापडी पिशव्या, कागदी फोल्डर, पर्यावरणपूरक खेळणी, छायाचित्र प्रदर्शनाचे उदघाटन दळवीज आर्ट इन्स्टिट्यूटचे प्राचार्य अजेय दळवी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी किर्लोस्करचे धीरज जाधव, राहुल पवार, अनिल चौगुले, भाऊसाहेब सूर्यवंशी, वीरेंद्र चित्राव, विजय टिपुगडे आदी उपस्थित होते.

या उपक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागा मध्ये 'प्लास्टिक बंदी-पर्याय' या विषयावर झालेल्या गटचर्चेमध्ये शंभर विद्यार्थ्यांनी भाग घेतला. यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रशांत गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. पी. डी. राऊत व्ही. एम. देशपांडे, राहुल पवार, उदय गायकवाड, अनिल चौगुले, आसावरी जाधव, पल्लवी भोसले आदी उपस्थित होते.

### आज महोत्सवात

सकाळी कात्यायनी परिसरात भ्रमंती करण्यात येणार आहे. दुपारी साडेबारा ते चारपर्यंत चित्रपट प्रदर्शन आणि सायंकाळी साडेपाच वाजता वसुंधरा मित्र व गौरव पुरस्कार वितरण संयोगीताराजे छत्रपती यांच्या हस्ते होणार आहे.

# विद्यापीठात आज चंद्र निरीक्षणाची संधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात गुरुवारी (दि. १०) चंद्राचे निरीक्षण करण्याची संधी मिळणार आहे. आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सवानिमित्त अवकाश केंद्राच्या वतीने पदार्थविज्ञान (फिजिक्स) विभागात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अवकाश संशोधन केंद्राच्या वतीने गुरुवारी 'चांद्रयान-२' मोहिमेचा माहितीपट दाखवण्यात येणार आहे. यानंतर चंद्राच्या पृष्ठभागाचे निरीक्षण १२ इंच दुर्बिणीच्या माध्यमातून करता येणार आहे.

# पर्यावरण रक्षण प्रत्येकाची जबाबदारी

## वीरेंद्र चित्राव : किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला प्रारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

देशातील प्रत्येक नागरिकाने पर्यावरण रक्षणासाठी आपला खारीचा वाटा उचलावा. भारतातील ८ राज्यांतील ३० मोठ्या शहरांत पर्यावरणाची चळवळ हाती घेतली आहे. त्यामुळे पर्यावरण रक्षण ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे समन्वयक वीरेंद्र चित्राव यांनी केले.

या महोत्सवाला बुधवारी राजर्षी शाहू स्मारक भवन येथे उत्साहात प्रारंभ झाला. महोत्सवाचे उद्घाटन बालपर्यावरणप्रेमींच्या हस्ते झाले. यावेळी प्लास्टिकच्या विळख्यातून प्रतीकात्मक स्वरूपात पृथ्वीची मुक्तता करण्यात आली व प्लास्टिकमुक्तीच्या जागराला प्रारंभ झाला.

चित्राव म्हणाले, देशात प्लास्टिकमुक्तीचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. देशात तरुणांची मोठी संख्या असून, देशातील तरुण प्लास्टिकमुक्त भारतासाठी काय योगदान देतो, याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले आहे. सध्या किर्लोस्कर इको रेंजर्सच्या माध्यमातून पर्यावरण रक्षणाची चळवळ हाती घेतली आहे.




**कोल्हापूर : राजर्षी शाहू स्मारक भवन येथे किर्लोस्कर वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला बुधवारी प्रारंभ झाला. यावेळी बालपर्यावरणप्रेमी यांच्यासह वीरेंद्र चित्राव, राहुल पवार, विजय टिपुगडे, अजेय दळवी, धीरज जाधव, अनिल चौगले, उदय गायकवाड आदी. (छाया : तय्यब अली)**

महोत्सवात पर्यावरणविषयक छायाचित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आले आहे. तसेच पर्यावरणपूरक वस्तू, टाकाऊ वस्तूंपासून तयार करण्यात आलेल्या वस्तू यांचा समावेशही आहे. याचबरोबर पृथ्वीला गिळणारा प्लास्टिकचा मासा यासारख्या कल्पक रचनेतून पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण केली आहे. चित्रकार अजेय दळवी यांनी, प्लास्टिकला पर्याय काय? कशाद्वारे कलेच्या माध्यमात नव्या साधनांचा उपयोग करता येईल, याकडे कलाप्रेमींचे लक्ष लागले असल्याचे सांगितले. धीरज जाधव यांनी, मानवाच्या जगण्यात प्लास्टिक अविभाज्य घटक बनले असले, तरी यामुळे निर्माण झालेली अविघटनशील कचऱ्याची समस्या जगाला भेडसावत असल्याचे सांगितले. पर्यावरण अभ्यासक उदय गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. आभार निसर्गमित्र संस्थेचे अनिल चौगले यांनी मानले. यावेळी चित्रकार विजय टिपुगडे, राहुल पवार यांच्यासह पर्यावरण क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

### लघुपटांचे प्रदर्शन

यावेळी रणथंबोर राष्ट्रीय उद्यानातील मचली या वाघिणीच्या आयुष्यावर आधारित लघुपट, मिडवे आईसलँड , गॅमो द क्वीन ऑफ माऊंटन्स, द रिटर्न ऑफ शांघाई यासारख्या लघुपटांचे सादरीकरण झाले.

पुढारी

# मिशिगन विद्यापीठाचे डॉ. स्टुअर्ट गॉर्डन शिवाजी विद्यापीठात रूजू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये नव्याने सुरू झालेल्या रिसर्च प्रोफेसर योजनेंतर्गत अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्राध्यापक स्टुअर्ट गॉर्डन यांची नियुक्ती करण्यात आली. नुकतेच इतिहास अधिविभागामध्ये ते रूजू झाले असून मे २०२० पर्यंत ते कार्यरत राहतील. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. सारा दुआल यादेखील फुलब्राईट स्कॉलर म्हणून विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात रूजू झाल्या आहेत. त्यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली. डॉ. स्टुअर्ट गॉर्डन यांनी युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगनमधून सन १९७२ मध्ये पीएच.डी. मिळवली. त्यांनी मराठा राज्याविषयीच्या मूळ कागदपत्रांचा अनुवाद करण्यात कैक वर्षे व्यतीत केली आहेत. त्यांनी सामाजिक बंधने आणि दरोडेखोरी, किल्ल्यांचे इतिहासातील योगदान, वारसाहक्क आणि राजपद, प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याची इतिहासातील उदाहरणे आणि युरोपीय पध्दतीच्या लष्कराचे झालेले अनुकरण अशा वैविध्यपूर्ण विषयांवर लेखन केलेले आहे.

पुढारी

# एलआयसी परीक्षेसंदर्भात शनिवारी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर: प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने एलआयसी सहाय्यक भरतीबाबत शनिवारी (दि.१२) कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. दुपारी ३ ते सांयकाळी ६ या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे.

या पदासाठी अर्ज केलेल्या व न केलेल्या तसेच या केंद्रात प्रवेश घेतलेल्या व न घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे.सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यविद्या इमारतीतही ही कार्यशाळा होणार आहे. दरम्यान शुक्रवारी (दि.११) दुपारी ३ ते ५ आणि शनिवारी (दि.१२) दुपारी ३ ते ५ या वेळेत 'स्पर्धा परीक्षेसाठी चालू राजकीय घडामोडी' यावर प्रा. डॉ. प्रकाश पवार यांचे तर 'स्पर्धा परीक्षा आणि सार्वजनिक अंदाजपत्रक' या विषयावर प्रा. डॉ. पी.एस.कांबळे यांचे व्याख्यान होणार आहे. विद्यापीठाच्या बॅरिस्टर खर्डेकर रिर्सोस सेंटर येथे ही व्याख्याने होणार आहेत, त्याला विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे असे केंद्रांचे संचालक डॉ. कांबळे यांनी केले आहे.

# डॉ. स्टुअर्ट गॉर्डन इतिहास विभागात



**शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासोबत रिसर्च प्रोफेसर योजनेंतर्गत अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातून शिवाजी विद्यापीठात रुजू झालेले प्राध्यापक स्टुअर्ट गॉर्डनसोबत त्यांच्या पत्नी डॉ. सारा दुआल व अन्य.**

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागामध्ये नव्याने सुरू झालेल्या रिसर्च प्रोफेसर योजनेंतर्गत अमेरिकेतील मिशिगन विद्यापीठातील प्राध्यापक स्टुअर्ट गॉर्डन यांची नियुक्ती करण्यात आली. नुकतेच इतिहास अधिविभागामध्ये ते रुजू झाले असून, मे २०२० पर्यंत ते कार्यरत राहतील. त्यांच्यासोबत त्यांच्या पत्नी डॉ. सारा दुआल यादेखील फुलब्राईट स्कॉलर म्हणून विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागात रुजू झाल्या आहेत. या दोघांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची भेट घेतली. कुलगुरूंनी दोघांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. स्टुअर्ट गॉर्डन यांनी युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगनमधून सन १९७२ मध्ये पीएच.डी. मिळवली. त्यांनी मराठा राज्याविषयीच्या मूळ कागदपत्रांचा अनुवाद करण्यात कैक वर्षे व्यतीत केली आहेत. त्यांनी सामाजिक बंधने आणि दरोडेखोरी, किल्ल्यांचे इतिहासातील योगदान, वारसा हक्क आणि राजपद, प्रतिकूल परिस्थितीतून मार्ग काढण्याची इतिहासातील उदाहरणे आणि युरोपीय पद्धतीच्या लष्कराचे झालेले अनुकरण अशा वैविध्यपूर्ण विषयांवर लेखन केलेले आहे. त्यांनी राजघराण्यांच्या वापरातील प्रतीकात्मक वस्तू आणि राजघराण्यांचे मैत्रीसंबंध या विषयांवरही संशोधनात्मक लिखाण केले आहे.

डॉ. स्टुअर्ट गॉर्डन यांचा 'द मराठाज' हा अत्यंत गाजलेला ग्रंथ असून त्यामध्ये मराठे मूळचे कोण होते, त्यांनी प्रतिष्ठा कशी मिळवली, मराठ्यांनी महसूल व्यवस्था कशी विकसित केली इत्यादी महत्त्वाच्या बाबींचा ऊहापोह केलेला आहे.

# शिवाजी विद्यापीठात चंद्र महोत्सव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आंतरराष्ट्रीय चंद्र महोत्सव हा विज्ञान आणि त्यासंबंधीचे शोध याच्या स्मरणार्थ २०१० पासून दरवर्षी साजरा करण्यात येतो. या वर्षी ४ ते १० ऑक्टोबर या 'जागतिक अंतराळ आठवड्यामध्ये' साजरा करण्याचे आवाहन नासा प्लॅनेटरी सोसायटी व लुनार अँड प्लॅनेटरी इन्स्टिट्यूटतर्फे करण्यात आले आहे.

या अनुषंगाने शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्रातर्फे दि. १० रोजी चंद्राचे निरीक्षण करण्यासाठी विशेष कार्यक्रम पदार्थ विज्ञान अधिविभागामध्ये आयोजित केला आहे. यावेळी चंद्राच्या पृष्ठभागाचे निरीक्षण १२ इंच दुर्बिणीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. खगोलप्रेमींनी चंद्र निरीक्षण व त्याविषयीच्या वैज्ञानिक माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी सहभाग घ्यावा, असे आवाहन अवकाश संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

# संशोधनाचे सामाजिक ज्ञानवृद्धीत योगदान आवश्यक

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, 'सारथी' फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांचा विद्यापीठात गौरव

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आपल्या संशोधनाने एकूण सामाजिक ज्ञानामध्ये नेमकी काय भर टाकली, कोणते योगदान दिले, या बाबीकडे संशोधकांनी गांभीर्यपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले. विद्यापीठातील ४८ संशोधक विद्यार्थ्यांची महाराष्ट्र शासनाच्या छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) विविध फेलोशिपसाठी निवड झाली आहे. राज्यात सर्वाधिक संख्येने या संशोधनवृत्ती प्राप्त केल्याबद्दल विद्यापीठातर्फे या विद्यार्थ्यांसह अन्य विविध योजनांखाली फेलोशीपप्राप्त ५७ विद्यार्थ्यांचा गौरव समारंभ आज राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, आपल्या संशोधनाने सामाजिक ज्ञानामध्ये थोडी का असेना भर पडली पाहिजे, याकडे आपला कटाक्ष असला पाहिजे. संशोधनाकडे आव्हान म्हणून पाहात असतानाच उपलब्ध साधनांचा पुरेपूर वापर करून त्याअंतर्गत हाती घेतलेल्या समस्येचे उत्तर शोधण्यासाठी संशोधकांनी प्रयत्न करायला हवेत. आपल्याला मिळालेल्या संशोधन वृत्तीचे नियोजन, व्यवस्थापन करण्याचे कौशल्यही संशोधक विद्यार्थ्यांनी आत्मसात करण्याची गरज आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात विविध फेलोशिपप्राप्त संशोधक विद्यार्थ्यांच्या गुणगौरव समारंभात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. व्यासपीठावर डॉ. पी. एस. पाटील, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर.**

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, वरिष्ठ संशोधक विद्यार्थ्यांनी खालील वर्गांत शिकण्यासाठी दाखल झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाविषयी आस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. विद्यापीठ स्तरावरील दर्जेदार संशोधनाचा वारसा पुढील विद्यार्थ्यांमध्ये त्या माध्यमातून झिरपत राहील आणि विद्यापीठीय संशोधनाचा दर्जा अबाधित राहील.

### विद्यार्थ्यांची संख्या अशी

'सारथी' योजनेअंतर्गत मा. मुख्यमंत्री विशेष संशोधन फेलोशिप-२०१९ (१६ विद्यार्थी), 'सारथी' राष्ट्रीय संशोधन फेलोशिप-२०१९ (३२ विद्यार्थी); अन्य विविध फेलोशिपप्राप्त (५७ विद्यार्थी) - एकूण १०५ विद्यार्थी.

यावेळी अरविंद पाटील (भौतिकशास्त्र) व प्रवीण शेंबडे (भूगोल) या संशोधक विद्यार्थ्यांनी प्रातिनिधिक मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे स्वागत विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले, तर उपकुलसचिव संजय कुबल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे संयोजन करण्यात आले.

# चला, वसुंधरेला प्लास्टिकपासून मुक्त करूया!

## किर्लोस्कर-वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन, इको फ्रेंडली सजावट

**कोल्हापूर, ता. ९ :** येथील दहाव्या किर्लोस्कर-वसुंधरा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन आज शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते झाले. प्लास्टिक पिशवीत अडकलेल्या पृथ्वीगोलाची मुक्तता करून हा पृथ्वीगोल पुढच्या पिढीकडे सुपूर्द करण्यात आला.

दरम्यान, शनिवार (ता. १२) पर्यंत चालणाऱ्या या महोत्सवांतर्गत छायाचित्रे, कागदी-कापडी पिशव्या आणि पर्यावरणपूरक खेळण्यांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्राचार्य अजय दळवी यांच्या झाले. प्रदर्शन सकाळी दहा ते सायंकाळी सहा या वेळेत सर्वांसाठी खुले असेल.

यानिमित्ताने शाहू स्मारक भवन परिसर इकोफ्रेंडली सजावटीने सजवण्यात आला आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे मुख्यालय प्रादेशिक अधिकारी नंदकुमार गुरव काही तांत्रिक कारणामुळे उद्‌घाटनाला उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांचे 'प्लास्टिक बंदी आणि वापर' या विषयावरील सादरीकरण त्यांच्या वतीने उदय गायकवाड यांनी सादर केले. यावेळी धीरज जाधव, राहुल पवार, अनिल चौगुले, भाऊसाहेब सूर्यवंशी, वीरेंद्र चित्राव, विजय टिपुगडे उपस्थित होते.

दरम्यान, उद्‌घाटन सोहळ्यानंतर 'वर्ल्ड मोस्ट फेमस टायगर' या चित्रपटाने महोत्सवाचा पडदा उघडला. त्यानंतर 'मिडवे आईसलँड', 'गॅमो द क्वीन ऑफ माऊंटन्स', 'द रिटर्न ऑफ संगाई' हे लघुपट दाखवण्यात आले. सकाळच्या सत्रात शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागात गटचर्चा झाली.

या वेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रशांत गायकवाड यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रा. डॉ. पी. डी. राऊत, व्ही. एम. देशपांडे, राहुल पवार, उदय गायकवाड, अनिल चौगुले, आसावरी जाधव, पल्लवी भोसले आदी उपस्थित होते.

### महोत्सवात आज...

- सकाळी सात ते नऊ : कात्यायनी येथे 'हेरिटेज वॉक'
- दुपारी साडेबारा ते चार : विविध चित्रपट व लघुपट
- सायंकाळी साडेपाच : वसुंधरा मित्र व वसुंधरा गौरव पुरस्कारांचे वितरण

(चित्रपट प्रदर्शन व पुरस्कार वितरण, शाहू स्मारक भवन येथे)



**कोल्हापूर : किर्लोस्कर-वसुंधरा चित्रपट महोत्सवाचे उद्‌घाटन बुधवारी अनोख्या पद्धतीने शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते झाले. या वेळी विजय टिपुगडे, राहुल पवार, अजय दळवी, उदय गायकवाड, धीरज जाधव, वीरेंद्र चित्राव, अनिल चौगुले आदी.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 OCT 2019

तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटीक ट्रॅकवर विभागीय मैदानी स्पर्धेला मालोजीराजे छत्रपती यांच्या हस्ते बुधवारी प्रारंभ झाला. या स्पर्धेतील एक क्षण. (छाया – रियाज ट्रेनर)

# विभागीय मैदानी स्पर्धेला प्रारंभ

- मालोजीराजे छत्रपती यांच्या हस्ते उद्घाटन
- शिवाजी विद्यापीठ अंतर्गत न्यू कॉलेजतर्फे विभागीय स्पर्धेचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या सिंथेटीक ट्रॅकवर बुधवारी न्यू कॉलेजतर्फे आयोजीत विभागीय स्पर्धेला शानदार प्रारंभ झाला. या स्पर्धेचे उद्घाटन वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष मालोजीराजे छत्रपती यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ.देवानंद शिंदे तर प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन डी.बी.पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना मालोजीराजे छत्रपती म्हणाले मैदानी स्पर्धेतील लवचिकता सर्व खेळाडूंच्यादृष्टीने अत्यंत महत्वाची असते. कुलगुरू शिंदे यांनी खेळातील कौशल्यामुळे खेळाडू आयुष्यात संकटांना तोंड द्यायला शिकतात, असे सांगितले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डी.बी.पाटील यांनी खेळाचे मानवाच्या आयुष्यात खूप महत्वाचे स्थान आहे, असे सांगितले. स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य डॉ.व्ही.एम.पाटील यांनी केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष आर.डी.पाटील, संचालक विनय पाटील, डॉ.पी.आर.शेवाळे, क्रीडा विभागप्रमुख पी.टी.गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 OCT 2019

तरुण भारत

■ **माहितीपट :** शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश केंद्राच्या वतीने चांद्रयान –२ माहितीपट व चंद्र विवरांचे निरीक्षण. स्थळ : पदार्थविज्ञान अधिविभाग. वेळ : रात्री ७:३० वाजता.